# MAHARASHTRA ACT No. VII OF 1972

## THE MAHARASHTRA TEMPORARY INCREASE IN ENTERTAINMENTS DUTY AND EDUCATION CESS ACT, 1972.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १७ एप्रिल १९७२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. VII OF 1972

## AN ACT TO PROVIDE FOR A TEMPORARY INCREASE IN ENTERTAINMENTS DUTY ON CERTAIN ENTERTAINMENTS, AND IN THE EDUCATION CESS

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक २० एप्रिल १९७२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७

**विशिष्ट करमणुकींवरील करमणूक करामध्ये आणि शिक्षण उपकरामध्ये तात्पुरती वाढ करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** विशिष्ट करमणुकींवरील करमणूक करामध्ये आणि शिक्षण उपकरामध्ये तात्पुरती वाढ करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करमणूक कर आणि शिक्षण उपकर यांमध्ये तात्पुरती वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, व्याप्ति आणि मुदत.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो दिनांक १९ नोव्हेंबर १९७१ या दिवशी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(४) हा अधिनियम, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात असण्याचे बंद होईल; आणि मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४, याच्या कलम ७ चे उपबंध हे, महाराष्ट्र अधिनियमाद्वारे हा अधिनियम रद्द झाला आहे असे समजून तो अंमलात असण्याचे बंद झाल्यावर लागू होतील.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) ज्या क्षेत्रात असा अधिनियम अंमलात असेल त्या क्षेत्राच्या संबंधात "संबंधित मुख्य अधिनियम" म्हणजे—

(१) मुंबई करमणूक कर अधिनियम, १९२३ ; किंवा

(२) महाराष्ट्र शिक्षण (उपकर) अधिनियम, १९६२ ;

(ब) या अधिनियमात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दप्रयोगांना, संबंधित मुख्य अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

करमणूक करामध्ये तात्पुरती वाढ. ३. (१) मुंबई करमणूक कर अधिनियम, १९२३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १ डिसेंबर १९७१ रोजी आणि त्या दिवसापासून त्या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये बसविण्यात आलेल्या करमणूक कराशिवाय, चलत्‌चित्राद्वारे दाखविण्यात येणाऱ्या कोणत्याही खेळाच्या प्रवेश फीवर पुढीलप्रमाणे जादा करमणूक कर बसविण्यात येईल व तो राज्य शासनाला देण्यात येईल:—

(जादा कर वगळून) प्रवेश फी जर—

(अ) एक रुपयापेक्षा अधिक नसेल तर, ५ पैसे जादा कर;

(ब) एक रुपयापेक्षा अधिक असेल तर, १० पैसे जादा कर,

प्रवेश फी ठोक रकमेत असेल तर, ठोक रकमेवर प्रत्येक रुपयास १० पैसे (जादा कर वगळून).

(२) संबंधित मुख्य अधिनियमातील "कलम ३" चे सर्व निर्देश हे, कलम ३ चे आणि या कलमाच्या उपबंधांचे निर्देश असल्याचे मानण्यात येईल.

शिक्षण उपकरामध्ये तात्पुरती वाढ. ४. (१) महाराष्ट्र शिक्षण (उपकर) अधिनियम, १९६२ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी त्या अधिनियमाच्या कलम ४ अन्वये बसविलेल्या आणि वसूल करण्यात आलेल्या कराशिवाय आणि विशेष आकारणीशिवाय,—

(अ) १ ऑक्टोबर १९७१ पासून, उक्त कलम ४ च्या खंड (अ) मध्ये निर्देशिलेल्या दराच्या पन्नास टक्के इतक्या दराने नगरपालिका क्षेत्रातील जमिनींवर आणि इमारतींवर कर बसविण्यात येईल व तो वसूल करण्यात येईल;

(ब) महसुली वर्षापासून (१ ऑगस्ट १९७१ पासून सुरू होणाऱ्या किंवा राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या बाबतीत नेमील अशा इतर तारखेपासून), राज्यातील ज्या शेतजमिनींवर व्यापारी पिके काढण्यात येत असतील त्या शेतजमिनींवर, उक्त कलम ४ च्या खंड (ब) मध्ये निर्देशिलेल्या दराच्या पन्नास टक्के इतक्या दराने विशेष आकारणी करण्यात येईल आणि ती वसूल करण्यात येईल.

(२) संबंधित मुख्य अधिनियमातील "कलम ४" चे सर्व निर्देश हे, कलम ४ चे आणि या कलमाच्या उपबंधांचे निर्देश असल्याचे मानण्यात येईल.

अन्यथा उपबंधित केले असेल त्याखेरीज संबंधित मुख्य अधिनियमाचे उपबंध लागू करणे. ५. या अधिनियमात अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल त्याखेरीज, संबंधित मुख्य अधिनियमाचे सर्व उपबंध हे, अशा प्रकारच्या संबंधित मुख्य अधिनियमान्वये शुल्क, कर आणि विशेष आकारणी बसविणे व त्यांची वसुली यांच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे या अधिनियमाद्वारे अथवा अधिनियमान्वये कोणतेही शुल्क, कर अथवा विशेष आकारणी बसविणे व त्यांची वसुली यांच्या संबंधात ते लागू होतील.

६. या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, कोणत्याही व्यक्तीस, तिने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेली कोणतीही कृती किंवा करावयाची वर्जिलेली कृती ही, या अधिनियमाच्या उपबंधाच्या अभावी संबंधित मुख्य अधिनियमान्वये अपराध ठरणार नसेल तर, दोषी ठरविण्यात येणार नाही ; किंवा अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिन्वये कोणत्याही व्यक्तीला जी शिक्षा देण्यात आली असती त्यापेक्षा अधिक शिक्षा त्या व्यक्तीला अशा कृतीबद्दल किंवा करण्याचे वर्जिलेल्या कृतीबद्दल दिली जाणार नाही. व्यावृत्ती.

७. (१) महाराष्ट्र करमणूक कर व शिक्षण उपकर यांमध्ये तात्पुरती वाढ करण्याबाबत अध्यादेश, १९७१ हा, याद्वारे, रद्द करण्यात येत आहे.

(२) अशा रीतीने अध्यादेश रद्द करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई ही, या अधिनियमान्वये केलेली गोष्ट किंवा केलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सहा रद्द करणे.

(यथार्थ अनुवाद)

के. मा. आराध्ये,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.